# पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

**प्रेसनोट** दिनांक:- ०७/१०/२०१८

## ग्रामीण पोलीस दल व महिंद्रा लॉजिस्टिक लि. यांचे संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियानाचे आयोजन

## रस्ता सुरक्षा व जीरो ॲक्सिडेंट झोन उपक्रमांचे अनावरण

---

नाशिक ग्रामीण जिल्हा वाहतुक पोलीस शाखा व महिंद्रा लॉजिस्टिक लि. यांचे संयुक्त विद्यमाने दि. ०६ ऑक्टोबर २०१८ रोजी विल्होळी येथील सप्तश्रृंगी लॉन्स येथे रस्ता सुरक्षा अभियान उद्घाटन सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे प्रमुख उपस्थितीत महिंद्रा लॉजिस्टिकचे **सी.ई.ओ. मा.श्री. पिरोजशॉ सरकारी**, महिंद्रा अॅण्ड महिंद्रा नाशिकचे व्हाईस प्रेसिडन्ट **श्री. हिरामण आहेर**, मा.अपर जिल्हाधिकारी नाशिक **श्री. निलेश सागर,** मा. अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड**, मा.प्रादेशिक परिवहन अधिकारी **श्री. भरत कळसकर**, नाशिक ग्रामीण जिल्हा वाहतुक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक **श्री. अनंत तारगे**, महामार्ग सुरक्षा पथकाचे पोलीस निरीक्षक श्री. पवार, १०८ हेल्पलाईनचे उत्तर महाराष्ट्र प्रमुख श्री. बाळासाहेब करंकाळे, तसेच महिंद्रा लॉजिस्टिक लि. व नाशिक ग्रामीण पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी सदर कार्यक्रम प्रसंगी उपस्थित होते. मा.पोलीस अधीक्षकांच्या हस्ते दिप-प्रज्वलन करून सदर कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास उपस्थित असलेले ट्रान्सपोर्ट व रोडलाईन्सचे मालक, ट्रक ड्रायव्हर, रिक्षा चालक, शाळा महाविद्यालयांचे वाहनांवरील चालक, शाळा/कॉलेजेसचे विद्यार्थी, परिसरातील प्रतिष्ठित नागरीक व गावकरी यांना रस्ता सुरक्षा अभियाना संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

राज्यातील नैसर्गिक मृत्युनंतर सर्वाधिक मृत्यू हे रस्ते अपघातात होत असतात, आणि या अपघातांमध्ये दरवर्षी जवळपास १२ हजार प्रवाशांचा मृत्यू होत असतो. त्यामुळे रस्त्यावरील प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सध्या ऐरणीवर आला आहे ही बाबत लक्षात घेवुन ग्रामीण पोलीस दल व महिंद्रा लॉजिस्टीक लिमिटेड यांचे संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत जिरो ॲक्सिटेंड झोन उपक्रमांची सुरूवात करण्यात आली आहे. समाजप्रबोधनाच्या माध्यमातुन रस्ता सुरक्षेचे महत्व लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य या अभियानाव्दारे केले जाणार आहे. अपघात झाला की आपण सगळे हळहळ व्यक्त करतो, परंतु अपघात टाळायचा असेल तर वाहतुक सुरक्षेचा, रस्ता सुरक्षेचा विचार हा एक संस्कार म्हणुन बिंबविणे जितके गरजेचे आहे, तितकेच भविष्यात आयुष्यभर त्याचे पालन करणेही आहे. अपघात झाल्यावर बोलण्यापेक्षा, अपघात होवु नये म्हणुन काळजी घेऊया, वाहतुक नियमांचे पालन करूया आणि दुर्देवाने अपघात झालाच तर एका सुजान नागरीकाचे कर्तव्य बजावुन जखमींना रूग्णालयात उपचारासाठी दाखल करूया. वाहन चालकांसोबत नागरीक, विद्यार्थी यांच्यामध्ये रस्ते सुरक्षेबाबत जाणीव जागृती झाल्यास अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार असुन अपघातांमुळे जिवीतहानी, वाहनांचे नुकसान, राष्ट्रीय संपत्तीची हानी टाळता येणार आहे. तसेच सदर अभियानात समाजातील सर्व घटकांनी सहभाग नोंदवुन वाहतुक नियमांचे पालन केल्यास अपघातांमुळे शासन यंत्रणांवर ताण व अपघातांचे प्रमाण कमी होण्यास निश्तिच मदत होईल. वाहतुकीचे नियम व कायद्याचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी रस्ते सुरक्षेला महत्व देवुन सडक सुरक्षा... जीवन रक्षा हा संकल्प आपण सर्व करू ॥ असे आवाहन जनतेस करण्यात आले आहे.

अपघातांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वाहतुक नियमांची कठोर अंमलबजावणी करणे हा या मोहिमेचा उद्देश न ठेवता समाजप्रबोधनातुन रस्ता सुरक्षेचे महत्व पटवुन द्यावे हा या मोहिमेचा उद्देश आहे. वाहतुकीचे नियम व त्याचे महत्व वाहन चालकांना समजावुन सांगणे, शाळांमधील परिवहन समित्यांची बैठक घेणे, स्कुल बसेसची तपासणी करून मार्गदर्शन करणे, तसेच वाहन चालकांचे प्रशिक्षण व आरोग्य शिबीर कार्यक्रम, अपघातग्रस्तांना प्रथमोपचार प्रशिक्षण, रस्ता सुरक्षा जनजागृतीकरीता चौकसभा, रॅली, पोस्टर्स/बॅनर्स/पत्रके प्रसारित करणे, अपघात प्रवण क्षेत्रात सुरळीत वाहन चालविणे, वेगावर मर्यादा ठेवणे, अपघातग्रस्तांना तातडीने मदत करणे असे विविध उपक्रम सदर रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत राबविले जाणार आहेत.

सदर रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत नाशिक ग्रामीण जिल्हा वाहतुक नियंत्रण शाखेतर्फे सर्व वाहन चालकांना आवाहन करण्यात येते की, १) दुचाकी वाहन चालवितांना हेल्मेटचा वापर करावा, २) चारचाकी वाहन चालवितांना सीट बेल्टचा वापर करावा, ३) वेगमर्यादेपेक्षा अतिवेगाने वाहन चालवु नये, ४) मद्य प्राशन करून वाहन चालवु नये, ५) वाहन चालवितांना मोबाईल फोन वापरणे टाळावे, ६) रस्त्यांवर धोकादायकरित्या वाहन चालवु नये, ७) वाहन चालवितांना पादचा-यांना प्राधान्य द्यावे, ८) लेन कटींग करू नये, ९) वाहनांचे इन्शुरन्स करून घ्यावे तसेच नियमित पी.यु.सी.चेक करून घ्यावे. १०) रस्त्यावरून येणा-या जाणा-या वाहनांना त्रास होईल या पध्दतीने वाहने पार्कींग करू नये, ११) वाहन परवाना नसलेल्या मुलांना वाहन चालविण्यास देवु नये, १२) रस्ता सुरक्षेसाठी सुचना फलक, चिन्हे यांचेकडे लक्ष देवुन त्यांचे काटेकोरपणे पालन करावे., १३) वाहन चालवितांना पुढील वाहनापासुन सुरक्षित अंतर ठेवावे, १४) ओव्हरटेक करतांना वाहनाचे उजव्या बाजुनेच करा., १५) आसन क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवु नये, १६) पालकांनी आपल्या मुलांना स्कुल बसेसमध्ये पाठवितांना योग्य ती खबरदारी घ्यावी तसेच वाहन चालकाची वैयक्तिक माहिती तसेच ड्रायव्हिंग लायसन्स, बिल्ला व वाहनाचे पेपर असल्याची खात्री करावी, **१७) अपघातग्रस्त व्यक्तीचे प्राण वाचविणे व त्यास तात्काळ वैद्यकिय उपचार मिळवुन देणे हे प्रत्येक व्यक्तीचे प्रथम कर्तव्य आहे**.

सदर कार्यक्रमाअंतर्गत उपस्थित वाहन चालक, तसेच पोलीस कर्मचारी व महिंद्रा लॉजिस्टिक कंपनीचे कर्मचारी यांचे वैद्यकिय तपासणी शिबीरही घेण्यात आले. जिरो ॲक्सिडेंट झोन उपक्रमाअंतर्गत महामार्गावरील अपघातांवर नियंत्रण ठेवणेसाठी वाहनचालकांनी वाहतुक नियमांचे पालन करून सुरळीत वाहने चालवावी असे आवाहन ग्रामीण पोलीस दलातर्फे करण्यात आले.